# छायाकल्प चंद्रग्रहण आज


## पहाटेपर्यंत दिसणार; सव्वातीन तास मिळणार पाहायला

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ४ : या वर्षातील दुसरे छायाकल्प चंद्र शुक्रवारी (ता. ५) होणार आहे. कोल्हापुरातून या ग्रहणास शुक्रवारी रात्री ११ वाजून १५ मिनिटांनी या ग्रहणाला सुरुवात होईल. शनिवारी (ता. ६) मध्यरात्री २ वाजून ३४ मिनिटांपर्यंत हे ग्रहण दिसेल. या कायाकल्प चंद्रग्रहणाचा कालावधी ३ तास १८ मिनिटे इतका आहे.

छायाकल्प चंद्रग्रहणाचा मध्याच्या वेळी चंद्र बिंबाची तेजस्विता उणे ०.४१ एवढी असेल. हे चंद्रग्रहण संपूर्ण भारतातून दिसणार आहे. यामुळे भारतातील खगोलहौशींना एक पर्वणी आहे. भारताबरोबरच हे ग्रहण आशिया, ऑस्ट्रेलिया, आफ्रिका, दक्षिण व पूर्व दक्षिण अमेरिका, पॅसिफिक, अॅटलांटिक, हिंद महासागर, अंटार्क्टिका या भागामधून दिसणार आहे.

चंद्रग्रहण हे चंद्र, पृथ्वी आणि सूर्य सरळ रेषेत आल्यावर होत असते. ज्यामध्ये पृथ्वीची सावली ही चंद्रावर पडते आणि चंद्रग्रहण आपणास दिसू लागते. तर छायाकल्प ग्रहणात पृथ्वीची पडछाया चंद्रावर पडणार आहे. चंद्र पूर्णतः झाकला जाणार नसून पृथ्वीच्या उपछायेतून मार्गस्थ होईल. परिणामी, तो आपल्याला तांबूस रंगाचा दिसेल.



### चंद्रग्रहणाची पर्वणी

पौर्णिमेच्या चंद्राची ग्रहकालावधीत तेजस्विता उणे ०.९७ ते उणे ०.४१ होणार असल्यामुळे ते उघड्या डोळ्यांनी पाहता येणार आहे. चंद्रग्रहण पाहणे डोळ्यांना हानिकारक नसल्याने पाहताना डोळ्यांची विशेष काळजी घ्यावी लागत नाही. कोणतेही साधन न वापरता डोळ्यांनीही चंद्रग्रहणाचा आनंद लुटता येईल. ग्रहण ही एक खगोलीय घटना आहे. त्याचा मानवी जीवनावर काहीही परिणाम होत नाही. तरी हे ग्रहण पहावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्या अवकाश संशोधन केंद्राचे समन्वयक डॉ. राजीव व्हटकर यांनी केले आहे.

# शिवाजी विद्यापीठाचे ज्ञानभांडार खुले

## बॅ. खर्डेकर नॉलेज रिसोर्स सेंटरतर्फे रिमोट एक्सेसद्वारे संकेतस्थळे उपलब्ध

**ऑंकार धर्माधिकारी : सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ४ : लॉकडाउनमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर नॉलेज रिसोर्स सेंटरने सर्व सबस्क्राईब केलेल्या साइट रिमोट एक्सेसद्वारे सर्वांसाठी खुल्या केल्या. यामुळे संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना, प्राध्यापकांना घरी राहून अभ्यास करणे शक्य झाले. एरवी या साइट्स केवळ विद्यापीठाच्या परिसरातच पाहता येत होत्या. या साईट्सचा वापर करून काही प्राध्यापकांनी कोव्हीड १९ या विषयावर शोधनिबंधही तयार केले. एका अर्थाने विद्यापीठाने हे ज्ञानभांडार सर्वांसाठी खुले झाले.



संशोधन म्हटले की संदर्भग्रंथ, विविध प्रकारे शोधनिबंध, पुस्तके, पी.एचडीचे थिसिस हे सर्व संशोधन साहित्य अभ्यासावे लागते. छापिल स्वरूपातील साहित्या आता डिजिटल स्वरुपात विविध संकेतस्थळांवर उपलब्ध झाले. आता विषय निहाय संकेतस्थळे आहेतच शिवाय विविध संशोधन संस्थांनी आपली संकेतस्थळेही बनवली आहेत. त्यामुळे आता संशोधक कोणत्याही संदर्भासाठी, माहितीसाठी ही संकेतस्थळे पडताळतात. ही संकेतस्थळे पैसे भरून सबस्क्राइब करावी लागतात. काही संकेतस्थळे महाग असतात. त्यामुळे विद्यापीठ सबस्क्राईब करून विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देतात. ही संकेतस्थळे केवळ विद्यापीठाने निश्चित केलेल्या परिसरात आणि ठराविक अंतरावरच पाहता येतात. अन्यत्र ती दिसत नाहीत.

कोरोना लॉकडाउन काळात संशोधनाचे काम करणे अशक्य होते. त्यांना ही संकेतस्थळे उपलब्ध नव्हती. ही अडचण लक्षात घेऊन बॅरिस्टर खर्डेकर नॉलेज रिसोर्स सेंटरने ही सर्व संकेतस्थळे रिमोट एक्सेसद्वारे सर्वांना खुली केली. यामुळे संशोधकांना ही संकेतस्थळे घरामध्ये पाहता येऊ लागली. ३० मार्च पासून आज पर्यंत ही संकेतस्थळे सर्वांना खुली आहेत. त्यामुळे संशोधन कामात खंड पडला नाही. याचा लाभ संशोधक, विद्यार्थी यांना तर झालाच मात्र काही प्राध्यापकांनी या संकेतस्थळाचे सहाय्य घेऊन कोव्हीड १९ या विषयावरचे शोधनिबंधही लिहीले. प्रा.डॉ.ज्योती जाधव, प्रा. डॉ.के.डी.सोनवणे, प्रा.डॉ.प्रमोद पाटील, प्रा.डॉ.जी.एस.गोकावी यांनी शोधनिबंध लिहिले.

> **संशोधनाच्या कार्यात खंड पडू नये, यासाठी आम्ही हा पर्याय उपलब्ध करून दिला. आय.टी.रेंजचा उपयोग करून रिमोट एक्सेसचा उपयोग करून संकेतस्थळे उपलब्ध करून दिली. याचा लाभ शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी, संशोधकांसह जगभरातील संशोधकांना झाला.**
>
> **- डॉ.नमिती खोत,**
>
> संचालक, बॅ.बाळासाहेब खर्डेकर नॉलेज, रिसोर्स सेंटर.

### खुली संकेतस्थळे

- ई शोध सिंधू
- स्प्रिंग नेचर रिसोर्स
- नॅशनल डिजिटल लायब्ररी
- केंब्रिज युनिव्हर्सिटी ई बुक
- द शोधगंगा रिसिव्ह पी.एचडी थिसिस
- स्पर्धा परीक्षांशी संबंधित संकेतस्थळे

# आज वर्षातील दुसरे छायाकल्प चंद्रग्रहण

## कोल्हापुरात रात्री ११.१५ मिनिटांनी सुरुवात; ६ जूनच्या पहाटे २.३४ पर्यंत दिसणार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

यंदाच्या वर्षातील दुसरे छायाकल्प चंद्रग्रहण हे शुक्रवार, दि. ५ जूनला होणार आहे. कोल्हापुरात दि. ५ जून रोजी रात्री ११ वाजून १५ मिनिटांनी या ग्रहणास सुरुवात होऊन ते दि. ६ जूनच्या रात्री पहाटे २ वाजून ३४ मिनिटांपर्यंत चालणार आहे. या छायाकल्प चंद्रग्रहणाचा कालावधी ३ तास १८ मिनिटे असणार आहे. हे चंद्रग्रहण संपूर्ण भारतात दिसणार आहे. यामुळे भारतातील खगोलप्रेमींसाठी ही एक पर्वणी आहे.

छायाकल्प चंद्रग्रहण हे भारताव्यतिरिक्त आशिया, ऑस्ट्रेलिया, आफ्रिका, दक्षिण, पूर्व दक्षिण अमेरिका, पॅसिफिक, अटलांटिक,



हिंद महासागर, अंटार्क्टिका या भागामधून दिसणार आहे. चंद्र, पृथ्वी आणि सूर्य सरळ रेषेत आल्यावर हे ग्रहण होत असते. ज्यामध्ये पृथ्वीची सावली चंद्रावर पडते आणि चंद्रग्रहण आपणास दिसू लागते. छायाकल्प ग्रहणात पृथ्वीची पडछाया चंद्रावर पडणार असून चंद्र पूर्णतः झाकला जाणार नाही, तर पृथ्वीच्या उपछायातून मार्गस्थ होईल. पौर्णिमेच्या चंद्राची ग्रहकालावधीत तेजस्विता उणे ०.९७ ते उणे ०.४१ होणार असल्यामुळे ते उघड्या डोळ्यांनी पाहता येणार आहे. चंद्रग्रहण पाहणे डोळ्यांना हानीकारक नसल्याने पाहताना डोळ्यांची विशेष काळजी घ्यावी लागत नाही. ग्रहण ही एक खगोलीय घटना आहे. त्याचा मानवी जीवनावर काहीही परिणाम होत नाही. तरी हे ग्रहण पाहावे, असे आवाहन विद्यापीठाच्या अवकाश संशोधन केंद्राचे समन्वयक डॉ. राजीव व्हटकर यांनी केले आहे.

पुढारी

# विपुल जैवविविधता



## शिवाजी विद्यापीठात पक्षी, प्राण्यांच्या अनेक प्रजाती

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर जगभरात पर्यावरणात अमूलाग्र बदल होत असताना शिवाजी विद्यापीठही त्याला अपवाद राहिलेले नाही. जलस्वयंपूर्णतेत आघाडीवर असताना पक्षी, प्राणी यांच्या विविध प्रजातींमुळे विद्यापीठ जैवविविधतेने बहरलेले पाहायला मिळत आहे.

विद्यापीठात ब्लॅक काईट, ब्लॅक शोल्डर काईट, ब्राह्मणी काईट, शिकारा, लिझर विसलिंग डक, रुडी शेलडक, कॉमन स्विफ्ट, ब्रॉंझ विंग जकना, ब्लॅक विंग स्टिल्ट, मार्श सँड पाईपर, ग्रे हॉर्न बिल, व्हाईट थ्रोटेड किंगफिशर, इंडियन रॉबीन, पर्पल सनबर्ड, हाऊस स्पॅरो, ग्रे हॉर्न पक्षी आढळतात. यातील काही पक्षी स्थलांतरित आहेत.

सरपटणाऱ्या प्राण्यांमध्ये गार्डन लिझार्ड, इंडियन रॅट स्नेक, व्हाईन स्नेक, स्पॅक्टॅकल कोब्रा, बँडेड कुकरी, रसेल व्हायपर आदींचा समावेश आहे. एशियन कॉमन टोड, इंडियन बुल फ्रॉग, क्रिकेट, बलून फ्रॉग, बॉम्बे कॉसिलियन हे उभयचर प्राणी, तर फुलपाखरांच्या कॉमन रेड आय, डार्क पाम डार्ट, ग्रास ब्लू, अँजल कॉस्टर अशा ५९ प्रजाती आढळतात. कोल्हे, तरस, वाटवाघूळ, खार, वेगवेगळ्या प्रकारचे ससे हे सस्तन प्राणी आहेत.



| जाती / प्रजाती | प्रकार |
|---|---|
| पक्षी | 136 |
| वृक्ष | 99 |
| फुलपाखरे | 59 |
| सरपटणारे प्राणी | 22 |
| साप | 15 |
| उभयचर प्राणी | 15 |
| कासव, सरडे, पाली | 6 |

> जागतिक पर्यावरण दिन यावर्षी जैवविविधता विषयावर साजरा होत आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर पृथ्वीवरील जैवविविधतेच्या ऱ्हासाला मानव हस्तक्षेप कारणीभूत असल्याचे सगळ्यांच्या लक्षात आले आहे. ही जैवविविधता टिकवून ठेवायची असल्यास मानवाचा हस्तक्षेप कमी झाला पाहिजे, तरच अस्तित्व राहील.
>
> **- डॉ. पी. डी. राऊत,** विभागप्रमुख, पर्यावरणशास्त्र विभाग

खिसमस ट्री, बबुल, खैर, रेन ट्री, शाल्मली, शंकासुर, बॉटल ब्रश, सुरू, हॅकबेरी, सागवान, सायकस, ऑईल पाम, नरूळ, ऑस्ट्रेलियन जीचवूड, चंदन, बदाम, निगडी आदी देशी-विदेशी वृक्ष पहायला मिळतात.

**जागतिक पर्यावरण दिन विशेष**

# मानवाची पर्यावरणाशी जवळीक

## लॉकडाऊनमुळे लोकवस्तीजवळ विकसित झाले 'जीवनजाळे'

**कोल्हापूर : सागर यादव**

कोरोनाच्या जागतिक संकटाचे अनेक सकारात्मक परिणामही सर्वत्र पाहायला मिळाले. प्रदूषणात प्रचंड घट होण्याबरोबरच लोकांची पर्यावरणाशी जवळीकता वाढली आहे. तब्बल तीन महिन्यांच्या कालावधीत पर्यावरणासह पशु, पक्षी यांना कशाचाही नाहक त्रास नसल्याने लोकवस्तीजवळ त्यांचे 'जीवनजाळे' विकसित झाले आहे.

भविष्यात या जीवनजाळ्याचे जतन, संवर्धन आणि संरक्षण आता आपली जबाबदारी आहे. तब्बल तीन महिन्यांच्या लॉकडाऊन कालावधीत अत्यावश्यक सेवा वगळून इतर सर्व व्यवहार ठप्प झाले. वाहतूक बंद असल्याने वातावरणातील धूर, धूळ याचबरोबर हवा व ध्वनिप्रदूषण प्रचंड प्रमाणात कमी झाले. पाण्याचा अनावश्यक वापर मोठ्या प्रमाणात कमी झाल्याने पाणस्थळांत होणारे सांडपाण्याचे प्रदूषणही मोठ्या प्रमाणात घटले. लोक घरातच थांबून असल्याने इतरत्र होणारे कचऱ्याचे ढीगही कमी झाले. लोकांचे इतरत्र फिरणे बंद असल्याने पर्यावरणातील पशु, पक्ष्यांसह सर्व घटकांना मुक्त संचार करता आला.



कोल्हापूर : शहर परिसरात आढळणारे विविध प्रकारचे देशी-परदेशी पक्षी. (छाया : तय्यब अली)

### लॉकडाऊन काळात दुप्पट पक्ष्यांची नोंद...

राजाराम कॉलेज परिसरात पर्यावरणातील घटकांचे 'जीवनजाळे' निर्माण झाले आहे. इतरवेळी दिसणाऱ्या पक्ष्यांच्या संख्येत दुप्पटीने वाढ झाल्याचे स्थानिक रहिवासी व अभियंता इंद्रजित नागेशकर यांनी सांगितले. लॉकडाऊनच्या काळात तब्बल २६ पक्ष्यांच्या नोंदी त्यांनी केल्या आहेत. यात ओरिएंटल व्हाईट आय, व्हाईट थ्रोटल फॅनटेल, पर्पल सनबर्ड, रम्पेड सनबर्ड, मिनवाईट, ग्रे हॉर्नबील, कॉमन टेलर बर्ड, टिकेल बल्यू आदी पक्ष्यांचा समावेश आहे. याशिवाय लहान कीटकांबरोबरच विविध प्रकारचे सर्प, मुंगूस, खार, मोर, पाणकोंबडी, पोपट, बगळे, मासे असे एकमेकांवर अवलंबून असणाऱ्या पशु, पक्ष्यांची साखळी निर्माण झाली आहे.

My Kolhapur Edition
5 Jun, 2020 Page No. 1
Powered by : erelego.com

पुढारी

# छायाकल्प चंद्रग्रहण आज

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

खगोलप्रेमींसाठी शुक्रवारी (दि.५) यंदाच्या वर्षातील दुसरे छायाकल्प चंद्रग्रहण पाहण्याची संधी मिळणार आहे.



**संग्रहित छायाचित्र**

छायाकल्प चंद्रग्रहण शुक्रवारी होणार आहे. कोल्हापुरातून ग्रहणास ५ जूनच्या रात्री ११ वाजून १५ मिनिटांनी सुरुवात होऊन ते ६ जूनच्या रात्री पहाटे २ वाजून ३४ मिनिटांपर्यंत चालणार आहे. छायाकल्प चंद्रग्रहणाचा कालावधी ३ तास १८ मिनिटे, तर मध्यरात्री १२ वाजून ५४ मिनिटांनी असेल. छायाकल्प चंद्रग्रहणाच्या मध्याच्या वेळी चंद्रबिंबाची तेजस्विता उणे ०.४१ एवढी असेल. हे चंद्रग्रहण संपूर्ण भारतातून दिसणार आहे. यामुळे भारतातील खगोलप्रेमींना पर्वणी असणार आहे. भारताव्यतिरिक्त हे ग्रहण आशिया, ऑस्ट्रेलिया, आफ्रिका, दक्षिण, पूर्व दक्षिण अमेरिका, पॅसिफिक, अटलांटिक, हिंद महासागर, अंटार्क्टिका भागामधून हे चंद्रग्रहण दिसणार आहे, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाच्या अवकाश संशोधन केंद्राचे समन्वयक डॉ. राजीव व्हटकर यांनी दिली.

पुढारी

# शाळा-महाविद्यालयांची कार्यालये सुरू होणार

## जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालये व विद्यापीठ यांच्यासह शैक्षणिक संस्थेची कार्यालये सुरू केली जाणार आहेत. याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी दौलत देसाई यांनी गुरुवारी दिले. ही कार्यालये केवळ शिक्षणेत्तर कामकाजासाठी सुरू राहतील, असेही त्यांनी आदेशात स्पष्ट केले.

राज्याचे मुख्य सचिव अजोय मेहता यांनी ३१ मार्च रोजी काढलेल्या आदेशातील मार्गदर्शक सूचनांत आज काहींसा फेरबदल करण्यात आला आहे. त्यानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्ह्यासाठी आदेश जारी केला. यानुसार ई-सामग्रीचा विकास, उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन, निकाल जाहीर करणे यासह शिक्षणेत्तर कामकाज करता येणार आहे. ही कार्यालये ८ जूनपासून खुली करण्यास परवानगी दिली आहे. खुल्या जागेत व्यायाम करण्यासाठी वापरण्यात येणारी उपकरणे, खेळाच्या ठिकाणची उपकरणे, स्विंग्स, बार आदींचा वापर करण्यास प्रतिबंध राहणार आहे.

लोकमत

# खगोलप्रेमींना आज छायाकल्प चंद्रग्रहण पाहण्याची संधी

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : खगोलप्रेमींसाठी या वर्षातील दुसरे छायाकल्प चंद्रग्रहण हे आज, शुक्रवारी पाहण्याची संधी मिळणार आहे. कोल्हापुरातून या ग्रहणास रात्री ११ वाजून १५ मिनिटांनी सुरुवात होईल. शनिवारी (दि. ६) रात्री पहाटे २ वाजून ३४ मिनिटांपर्यंत ग्रहण चालणार आहे.

या ग्रहणाचा कालावधी हा ३ तास १८ मिनिटे असून, तर याचा मध्य रात्री १२ वाजून ५४ मिनिटांनी असेल. ग्रहणाचा मध्याच्या वेळी चंद्र बिंबाची तेजस्विता उणे ०.४१ एवढी असेल. ग्रहणात पृथ्वीची पडछाया चंद्रावर पडणार असून चंद्र पूर्णत: झाकला जाणार नाही. पृथ्वीच्या उपछायातून मार्गस्थ होईल.

यावेळी पौर्णिमेच्या चंद्राची ग्रहकालावधीत तेजस्विता उणे ०.९७ ते उणे ०.४१ होणार असल्यामुळे ते उघड्या डोळ्यांनी पाहता येणार आहे. चंद्रग्रहण पाहणे डोळ्यांना हानीकारक नसल्याने पाहताना डोळ्यांची विशेष काळजी घ्यावी लागत नाही. साध्या डोळ्यांनी ही चंद्रग्रहणाचा आनंद लुटता येईल. ग्रहण ही एक खगोलीय घटना आहे. त्याचा मानवी जीवनावर काहीही परिणाम होत नाही, तरी हे ग्रहण पाहावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्या अवकाश संशोधन केंद्राचे समन्वयक डॉ. राजीव व्हटकर यांनी गुरुवारी केले आहे.

# खगोलप्रेमींसाठी आजचे चंद्रग्रहण पाहण्याची संधी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**कोल्हापूर :** या वर्षातील दुसरे छायाकल्प चंद्रग्रहण हे ५ जूनला होणार आहे. कोल्हापुरात या ग्रहणास ५ जूनच्या रात्री ११ वाजून १५ मिनिटांनी या ग्रहणास सुरुवात होऊन ते पहाटे २ वाजून ३४ मिनिटांपर्यंत ग्रहण चालणार आहे. ग्रहणाचा मध्याच्या वेळी चंद्र बिंबाची तेजस्विता उणे ०.४१ एवढी असेल.

हे चंद्रग्रहण भारतातील खगोलहौशींनाही एक खगोल पर्वणी आहे. चंद्रग्रहण हे चंद्र, पृथ्वी आणि सूर्य सरळ रेषेत आल्यावर होत असते. ज्यामध्ये पृथ्वीची सावली चंद्रावर पडते आणि चंद्रग्रहण दिसू लागते. पौर्णिमेच्या चंद्राची ग्रहणकालावधीत तेजस्विता उणे ०.९७ ते उणे ०.४१ होणार आहे. चंद्रग्रहण पाहणे डोळ्यांना हानीकारक नसल्याने त्याचा आनंद लुटता येईल, असे शिवाजी विद्यापीठाच्या अवकाश संशोधन केंद्राचे समन्वयक डॉ. राजीव व्हटकर यांनी गुरुवारी सांगितले.